दैनिक नगुशे

# BMC मध्ये काँग्रेसचा नगरसेवक 'नंबर वन'; प्रजा फाउंडेशनचं प्रगती पुस्तक आलं!

August 19, 2021

## हायलाइट्स:

- प्रजा फाउंडेशननं प्रसिद्ध केलं नगरसेवकांचं प्रगती पुस्तक
- काँग्रेसचे रवी राजा हे पहिल्या क्रमांकावर
- समाधान सरवणकर दुसऱ्या तर हरीश छेडा तिसऱ्या स्थानी

**मुंबई:** प्रजा फाउंडेशनने मुंबई महामापालिकेतील नगरसेवकांच्या कामगिरीचा आढावा घेत गुरुवारी संयुक्त प्रगती पुस्तक अहवाल प्रसिद्ध केला. त्या अहवालानुसार पहिल्या क्रमांकावर पालिकेचे विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नगरसेवक रवी राजा, दुसऱ्या क्रमांकावर शिवसेनेचे समाधान सरवणकर आणि तिसऱ्या तक्रमांकावर भाजपच्या हरीश छेडा यांची निवड झाली आहे. (Praja Foundation Report On BMC Corporators)

करोना प्रादूर्भावामुळे प्रजा फाउंडेशनने यंदा नगरसेवकांचे वार्षिक प्रगती पुस्तक तयार केलेले नाही. त्याऐवजी संयुक्त प्रगती पुस्तक तयार केले आहे. त्यात रवी राजा, समाधान सरवणकर व हरीश छेडा या तिघांना अनुक्रमे ८१.१२ टक्के, ८०.४२ टक्के आणि ७७.८१ टक्के गुण प्राप्त झाले आहेत.

**वाचा: LIVE नारायण राणेंच्या जन आशीर्वाद यात्रेमुळं मुंबईत वाहतूक कोंडी**

करोना प्रादूर्भावामुळे प्रजा फाउंडेशनने यंदा नगरसेवकांचे वार्षिक प्रगती पुस्तक तयार केलेले नाही. त्याऐवजी नगरसेवकांच्या २०१७ ते २०२१ पर्यंतच्या चार वर्षांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. या संयुक्त प्रगती पुस्तकात प्रजा फाउंडेशनने विशिष्ट निकषांची गोळाबेरीज केल्यानंतर मुंबई पालिकेतील एकूण नगरसेवकांपैकी केवळ १० टक्के म्हणजेच २२ नगरसेवकांचा 'अ' आणि 'ब' श्रेणीत समावेश आहे. तर उर्वरित नगरसेवकांचा क, ड, ई, फ श्रेणीत समावेश झाला आहे.

Link:- https://nagushe.news/bmc-%e0%a4%ae%e0%a4%a7%e0%a5%8d%e0%a4%af%e0%a5%87-%e0%a4%95%e0%a4%be%e0%a4%81%e0%a4%97%e0%a5%8d%e0%a4%b0%e0%a5%87%e0%a4%b8%e0%a4%9a%e0%a4%be-%e0%a4%a8%e0%a4%97%e0%a4%b0%e0%a4%b8%e0%a5%87%e0%a4%b5/